Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's
# College of Education, Barshi
Publicity 2023 to 2024

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi,

(Maharashtra)

---

Academic Year 2023-2024

---

# Publicity

---

Submitted by

**Dr.S.S.Gore**

**Principal**

**Prof. Dr. V. P. Shikhare**

**IQAC Coordinator**

**Dr.M.V.Mate**

**Publicity Coordinator**

पुढारी

# कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये २६ जणांचे रक्तदान

## कर्मवीर जयंती सप्ताहानिमित्त उपक्रम; शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२१ व्या जयंतीनिमित्त कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी व श्रीमान रामभाई शहा रक्तकेंद्र बार्शी यांच्या वतीने आयोजित शिबिरात २६ जणांनी रक्तदान केले.

कर्मवीर जयंती सप्ताहाच्या कालावधीत रक्तदान शिबिर, व्याख्यान, कर्मवीर मामांच्या जीवनावर आधारित चित्रपट दाखविणे, विद्यार्थी मनोगते, समाजप्रबोधन रॅली आदी उपक्रमांचे आयोजन केले आहे. यानिमित्ताने सप्ताहाची सुरुवात रक्तदान शिबिराने करण्यात आली. या शिबिराचे उदघाटन प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी आयक्यूएसी समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. एस. एम. लांडगे, डॉ ए. जी. कांबळे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



बार्शी : रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवर.

प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी रक्तदान शिबिराचा उद्देश विशद केला. ते म्हणाले, कर्मवीर मामा देखील रक्तदान शिबिर आयोजित करत असत. रक्तदान हेच श्रेष्ठ दान आहे. रक्तदानामुळे एखाद्याचा जीव वाचू शकतो. यातून मिळालेले समाधान सर्वांत मोठे असते. प्राचार्य डॉ. गोरे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी असे एकूण २६ जणांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

Solapur Edition
Feb 1, 2024 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

## Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal’s

# College of Education, Barshi

### Publicity 2023 to 2024

पुढारी

# कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये बी. एड्. विद्यार्थ्यांचे स्वागत

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील शिक्षण शास्त्र महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रवेश घेतलेल्या बी.एड्. प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे स्वागत व प्राचार्यांचे अभिभाषण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे होते. यावेळी डॉ एस. डी. भिलेगावकर, डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. एम. एस. डिसले, डॉ. आर. ए. फुरडे, डॉ. एम. व्ही. मते, डॉ. पी.ए. पाटील आदी उपस्थित होते.

महापुरुषांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. डॉ. पी. ए. पाटील यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाचा उद्देश विशद केला. डॉ. एस. डी. भिलेगावकर यांनी सर्व शिक्षकांचा परिचय करून दिला. सर्व बी. एड्. प्रथम वर्ष प्रशिक्षणार्थींनी स्वपरिचय करून दिला.

डॉ. एम. व्ही. मते यांनी महाविद्यालयाच्या मानवी व भौतिक सुविधांची सविस्तर माहिती पीपीटीद्वारे सादर केली. डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी नॅक मूल्यांकन संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. नॅक मूल्यांकनात विद्यार्थ्यांची भूमिका याविषयी सविस्तर माहिती दिली.

प्राचार्य गोरे यांनी महाविद्यालयाची स्थापना व हेतू विशद केला. विद्यार्थ्यांनी भविष्यात एक चांगला सक्षम शिक्षक व्हावे या उद्देशाने या महाविद्यालयात उपक्रम आयोजित केले जातात. आभार डॉ. आर. ए. फुरडे यांनी मानले.

My Solapur Edition
Nov 1, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal’s

# College of Education, Barshi

**Publicity 2023 to 2024**

पुढारी

# कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या १५ विद्यार्थ्यांना शिक्षक भरतीद्वारे नियुक्ती

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र शासनाच्या पवित्र पोर्टल भरतीत येथील कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या १५ विद्यार्थ्यांची राज्याच्या विविध जिल्ह्यांत शिक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. कॉलेज ऑफ एज्युकेशनने ही यशस्वी परंपरा कायम ठेवली आहे.

संस्थेच्या व कॉलेजच्या दृष्टीने ही गौरवास्पद व भूषणावह बाब आहे. यामुळे कॉलेजच्या गुणवत्तेत व नावलौकिकात पुन्हा एकदा भर पडली आहे. यात बी.एड्., बी.पी.एड्., एम.एड्. व एम.पी.एड्. विभागाच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. यामध्ये सोमनाथ वेदपाठक, लक्ष्मण वाघ, नितीन रसाळ, समाधान गाढवे, आनंद मोरे, महेश जगदाळे, अमर गोडगे पाटील, वैभव घुगे, मधुरा गुंड, मनोज पाटील, महेश कसपटे, अश्विनी वाघ, प्रतिज्ञा भदेकर, राहुल मोरे, लक्ष्मण जगताप यांची पवित्र पोर्टलद्वारे शिक्षकपदी नियुक्ती झाली आहे. कॉलेजच्या स्पर्धा परीक्षा विभागाच्यावतीने सातत्याने मार्गदर्शन व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात तज्ज्ञ मार्गदर्शक व माजी विद्यार्थी यांचे मार्गदर्शन व व्याख्यान उपयुक्त ठरले. संस्थाध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, ए. पी. देबडवार, जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे, व्ही. पी. शिखरे आदींनी यशस्वितांचे अभिनंदन केले.

My Solapur Edition
Mar 2, 2024 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal’s

# College of Education, Barshi

**Publicity 2023 to 2024**

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी



बार्शी : विज्ञान दिनानिमित्त महापुरुषांना अभिवादन करताना मान्यवर.

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये विज्ञान दिन

**बार्शी :** येथील कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे हे होते. यावेळी व्यासपीठावर प्रा. डॉ. ए. जी. कांबळे, डॉ. एम. एस. डिसले, डॉ. आर. ए. फुरडे, डॉ. एम. व्ही. मते, डॉ. पी. ए. पाटील, प्रा. के. बी. चव्हाण आदी उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे व सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

आपला एक नवीन साईड बिजनेस स्टार्ट करा. आपण नोकरदार किंवा व्यावसायिक असा. सर्वत्र डिलर नेमणे आहेत.
प्रत्येक ग्राहकांना आकर्षक कमिशन
संपर्क : 7588119439

My Solapur Edition
Mar 5, 2024 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2023 to 2024**

पुढारी

# कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये नशामुक्त युवक अभियान

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालय, आयुष इन्स्टिट्यूट फॉर डिक्शन मॅनेजमेंट व लायन्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने नशामुक्त युवक अभियान राबविण्यात आले. या अभियानात रांगोळी, वक्तृत्व, घोषवाक्य व पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. स्पर्धेचे विषय व्यसनांचे दुष्परिणाम, उपाय व्यसनमुक्तीचे, नशामुक्त युवक आणि नशामुक्त भारत असे होते.

'आयुष'चे डॉ. संदीप तांबारे यांनी नशामुक्त युवक अभियान यावर व्याख्यान दिले. आयुष संस्थेमार्फत चालविले जाणारे सामाजिक उपक्रम विशद केले. व्यसन ही एक मोठी गंभीर समस्या आहे. मोबाईल, दारू, तंबाखू आदी व्यसनांच्या विळख्यात आजचा तरुण गुंतला आहे. व्यसनावर वेळीच नियंत्रण ठेवल्यास व्यसनमुक्ती शक्य आहे. युवा पिढीने व्यसनांपासून दूर राहिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी युवकांनी व्यसनांपासून दूर राहिले पाहिजे, असे सांगितले.




बार्शी : नशामुक्त युवक अभियानप्रसंगी युवकांना मार्गदर्शन करताना 'आयुष'चे डॉ. संदीप तांबारे. व्यासपीठावर मान्यवर.

लायन्स क्लब बार्शी टाऊन तेजस्विनीच्या अध्यक्षा अर्चना आवटे यांनी नशामुक्त अभियानाची माहिती सांगितली. अभियानासाठी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, 'आयुष'चे डॉ. संदीप तांबारे, डॉ. तनुजा चिकणे, अर्चना आवटे, प्रा. स्मिता सुरवसे, डॉ. एल. आय. राठोड, शिक्षकेतर कर्मचारी व बी.एड्. प्रशिक्षणार्थ्यांनी प्रयत्न केले. सूत्रसंचालन डॉ. तनुजा चिकणे यांनी केले. जयश्री ढगे यांनी आभार मानले.

यामध्ये रांगोळी स्पर्धेत सोनाली आगलावे, सोनाली रामगुडे, प्रतीक्षा देशमुख, पूनम पंडित यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला. वक्तृत्व स्पर्धेत आकाश माळी, संध्याराणी साळुंके, अंकिता धस व प्रतीक्षा देशमुख यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला. घोषवाक्य स्पर्धेत सोनाली आगलावे, ऋतुजा गरड, सुप्रिया दिवे व आकांक्षा क्षीरसागर यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला. पोस्टर स्पर्धेत पूनम पंडित, विशाखा सांगुळे, मनिषा जानराव व ऋतुजा गरड यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावला.

My Solapur Edition
Sep 6, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2023 to 2024**

पुढारी



बार्शी : नॅक मूल्यांकनानंतर आयोजित सत्कार समारंभाप्रसंगी मान्यवर.

# कॉलेज ऑफ एज्युकेशनची नॅक मूल्यांकनात गुणवत्तेची परंपरा कायम

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन या महाविद्यालयाने नॅक मूल्यांकनात 'अ' श्रेणी प्राप्त केल्याबद्दल संस्थेच्या वतीने सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव होते. व्यासपीठावर पी. टी. पाटील, जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, डॉ. व्ही. पी. शिखरे आदी उपस्थित होते.

संस्थाध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव यांनी महाविद्यालयाच्या यशाबद्दल आनंद व्यक्त करत संस्थेच्या इतिहासात नोंद घ्यावी, अशी ही महत्त्वपूर्ण घटना असल्याचे सांगितले. महाविद्यालयाची इमारत, ग्रंथालय, जलतरण तलाव, इनडोअर हॉल, विविध क्रीडांगणे, संशोधन केंद्र, एनएसएस विभाग, विद्यार्थी वार्षिक निकाल, शिक्षकांचा व्यावसायिक विकास, तज्ज्ञ प्राध्यापकवृंद, संशोधन लेख, माजी विद्यार्थी संस्था याच्या जोरावरच महाविद्यालयाने ३.०४ गुण मिळवून 'अ' श्रेणी प्राप्त केली. या यशाबद्दल संस्थेच्या वतीने सत्कार सोहळा साजरा करण्यात आला. प्राध्यापक मनोगतात डॉ. एम. व्ही. मते यांनी नॅक तयारी करताना आलेले अनुभव विशद केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी नॅकला सामोरे जाताना संस्था व महाविद्यालयाचे योगदान विशद केले. संस्थेचा भक्कम पाठिंबा व सहकार्य या जोरावरच 'अ' श्रेणी खेचून आणली, असे त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन डॉ. पी. ए. पाटील यांनी केले. आभार डॉ. आर. ए. फुरडे यांनी मानले.

My Solapur Edition
Dec 8, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2023 to 2024**

पुढारी

## संक्षिप्त



बार्शी : प्राचार्य डॉ. गोरे यांना सन्मानित करताना मान्यवर.

# प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांना उत्कृष्ट शाखाप्रमुख पुरस्कार

**बार्शी :** श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे शिक्षक गौरव पुरस्कार कार्यक्रमात कॉलेज ऑफ एज्युकेशनमधील प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांना उत्कृष्ट शाखाप्रमुख पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. औरंगाबाद विभागाचे शिक्षक आ. विक्रम काळे, पुणे विभागाचे शिक्षक आ. जयंत आसगावकर, संस्थाध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सचिव पी. टी. पाटील, ए. पी. देबडवार, बापू शितोळे यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. गोरे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. प्राचार्य गोरे यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील ६० शैक्षणिक परिषदा, कार्यशाळा यामध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक मासिकांमधून जवळपास ५० संशोधन लेख प्रकाशित झाले आहेत. शिक्षण क्षेत्रातील नऊ शैक्षणिक ग्रंथांचे लेखन केले आहे. ११ विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. व १२ विद्यार्थ्यांनी एम.फिल. या पदव्या संपादन केल्या आहेत.

My Solapur Edition
Sep 11, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2023 to 2024**

पुढारी



बार्शी : ग्राम-शहर विकास शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी शितोळे व इतर.

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये शिबिर

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकास शिबिराचा प्रारंभ जयकुमार शितोळे यांनी केला.

माजी प्राचार्य डॉ. सी. एस. मोरे, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे व डॉ. व्ही.पी. शिखरे, किसान कामगार विद्यालयाचे मुख्याध्यापक एम. एस. शेळके, सतीश ठोंगे, सरडे, शिंदे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. एस. डिसले यांनी केले. यानंतर या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या निमित्ताने जयकुमार शितोळे यांनी विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील समस्या, श्रमसंस्कार शिबिराचे महत्त्व, युवा विकासात रासेयोचे अनन्यसाधारण महत्त्व आहे तसेच ते श्रमसंस्कार शिबिर राबवताना कोणकोणत्या बाबी महत्त्वाच्या आहेत तसेच त्या राबवत असताना कोणत्या गोष्टींची काळजी घेतली पाहिजे आणि ते कशारितीने पूर्ण केले पाहिजे, याविषयी मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन स्वयंसेविका अंकिता घस हिने केले. तसेच प्रमुख पाहुण्यांचा परिचय अमोल भोसले याने दिला. या कार्यक्रमाचे आभार आकांक्षा क्षीरसागर हिने केले. सामूहिक राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

Solapur Edition
Jan 14, 2024 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2023 to 2024**

पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी



बार्शी : सोलापूर विद्यापीठाचा बास्केटबॉलचा मुलींचा संघ.

## विद्यापीठाचा बास्केटबॉलचा मुलींचा संघ नागपूरला रवाना

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

क्रीडा महोत्सव स्पर्धेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचा बास्केटबॉलचा मुलींचा संघ नागपूरला रवाना झाला. १२ जानेवारी ते १६ जानेवारी २०२४ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी विद्यापीठ नागपूर येथे क्रीडा महोत्सव होत आहे. या क्रीडा महोत्सवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा मुलींचा बास्केटबॉलचा संघ सहभागी होत आहे. या संघाचे सराव शिबिर सहा ते नऊ जानेवारीदरम्यान कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी येथे झाले. या संघामध्ये कॉलेज ऑफ एज्युकेशनमधील सुप्रिया वळवे, सीमा मदगुंडी सहभागी आहेत. या सराव शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे उपस्थित होते. त्यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या. या संघाच्या मार्गदर्शक म्हणून कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये कार्यरत असलेल्या प्रा. स्मिता सुरवसे काम पाहत आहेत.

Solapur Edition
Jan 15, 2024 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2023 to 2024**

पुढारी



बार्शी : बास्केटबॉल स्पर्धेत उपविजेते ठरलेला बार्शीचा कॉलेज ऑफ एज्युकेशनचा संघ.

## कॉलेज ऑफ एज्युकेशन उपविजेते

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आंतरमहाविद्यालय मुले व मुली बास्केटबॉल स्पर्धा सांगोला महाविद्यालयात पार पडल्या. या स्पर्धेमध्ये मुलांच्या १० व मुलींच्या चार संघांनी सहभाग नोंदविला. यात बार्शीच्या कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या मुलींच्या संघाने उपविजेतेपद मिळविले. या संघात सुप्रिया वळवी, (कर्णधार) सीमा मतगुंडी, शुभांगी मेनकुदळे, रसिका माळी, सोनल मलिक, चैताली भंडारी, महिमा चौधरी, स्नेहल देशमुख, सोनाली रामगुडे, स्नेहा महेंद्रकर या खेळाडूंचा सहभाग होता. या संघाला प्रा.डॉ सुरेश लांडगे, स्मिता सुरवसे, प्रा. खंडू चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. या संघाचे संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे आदींनी अभिनंदन केले.

My Solapur Edition
Oct 24, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal’s

# College of Education, Barshi

**Publicity 2023 to 2024**

पुढारी
www.pudhari.com

News by
गणेश गोडसे,बार्शी

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये मतदार जाणीव जागृती

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये बार्शी तहसील कार्यालय निवडणूक विभाग, आयक्यूएसी, रासेयो व निवडणूक साक्षरता मंडळ यांच्या वतीने मतदार जाणीव जागृतीनिमित्ताने विविध उपक्रम राबविण्यात आले.

निबंध लेखन स्पर्धेत बी.एड. प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. यात ऋतुजा गरड, प्रियांका खबाले व गीतांजली भंडारे, रेणुका रानमाळ व माहेश्वरी पवार यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक संपादन केला. काव्य लेखन स्पर्धेत स्वप्नाली सोनवणे, विद्या अर्जुने, स्वप्नाली काळे व अश्विनी वायचळ यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांक संपादन केला. घोषवाक्य स्पर्धेत ऋतुजा गरड, विद्या अर्जुने, गीतांजली भंडारे व माहेश्वरी पवार यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांक संपादन केला. पोस्टर निर्मिती स्पर्धेत धनश्री भोसले, प्रियंका खबाले व जगन्नाथ शिनगारे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक संपादन केला.

रांगोळी स्पर्धेत दीक्षा कांबळे, स्वप्नाली सोनवणे, भैरू जाधव व ऋतुजा लोंढे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक संपादन केला. नोडल अधिकारी डॉ. एम. व्ही. मते यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, व्ही. पी. शिखरे, एम. एस. डिसले, आर. ए. फुरडे, पी. ए. पाटील, एल. आय. राठोड यांनी परिश्रम घेतले.



बार्शी : मतदार जाणीव जागृती अंतर्गत विद्यार्थ्यांनी तयार केलेले पोस्टर्स.

My Solapur Edition
Mar 28, 2024 Page No. 03
newspaper.pudhari.co.in

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal’s

# College of Education, Barshi

**Publicity 2023 to 2024**

पुढारी



बार्शी : तहसीलदारांच्या हस्ते पुरस्कार प्रदान स्वीकारताना महाविद्यालयाचे शिक्षक.

## कॉलेज ऑफ एज्युकेशनला ‘उत्कृष्ट महाविद्यालय’ पुरस्कार

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी महाविद्यालयास २५ जानेवारी रोजी बार्शी तहसीलचा ‘उत्कृष्ट महाविद्यालय’ पुरस्कार तहसीलदार एफ. आर. शेख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, नायब तहसीलदार संजीवन मुंढे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. एस. डिसले, तहसीलचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य व सोलापूर जिल्हा मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय यांच्यावतीने नवमतदार नोंदणी व मतदार जाणीव जागृती कार्यक्रम सन २०२३ मध्ये घेण्यात आला. यात तहसील कार्यालय, बार्शी व कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार जाणीव जागृती अभियान राबविण्यात आले. यात नवमतदार नोंदणी अभियान व मतदार जाणीव जागृती उपक्रम घेण्यात आले. महाविद्यालयातील निवडणूक साक्षरता मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये मताधिकार, लोकशाही यासंबंधी केलेली जागृती, राबविण्यात आलेले उपक्रम, नवमतदार नोंदणी करण्यात आली. याबद्दल महाविद्यालयाचा ‘उत्कृष्ट महाविद्यालय’ पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. याबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, एन. एन. जगदाळे, पी. टी. पाटील, ए. पी. देबडवार, जे. सी. शितोळे, संस्थेचे कार्यकारिणी सदस्य व विश्वस्त यांनी अभिनंदन केले आहे.

My Solapur Edition
Jan 30, 2024 Page No. 2
newspaper.pudhari.co.in